खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

कार्यक्रम व उत्सव समिती

शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

स्व. साहेबराव बुट्टेपाटील यांच्या २३ व्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम

दि. ३ जानेवारी २०२४ रोजी माजी आमदार आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष साहेबराव बुट्टेपाटील यांच्या २३ व्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आहे.या प्रसंगी ह.भ.प. चंद्रकांत महाराज वांजळे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष □ड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, प्राचार्य एच.एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही.बी. दौंडकर, प्रबंधक के.आर. पाचारणे उपस्थित होते.

स्मृतिदिनानिमित्त क्रीडाज्योत, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, भीत्तिपत्रकाचे अनावरण, हस्ताक्षर स्पर्धा आदि विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या वेळी एन.सी.सी.कॅडेट्सनी मानवंदना दिली. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ६० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या प्रसंगी ह.भ.प. चंद्रकांत महाराज वांजळे यांचे व्याख्यान झाले. माणसाचे समग्र जीवन उजळून टाकण्याचे सामर्थ्य शिक्षणात असल्याचे ओळखून माजी

HRM

आमदार साहेबराव बुट्टेपाटील यांनी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने ज्ञानाची शक्ती उभी केल्याचे गौरवोद्गार ह.भ.प. चंद्रकांत महाराज वांजळे यांनी व्यक्त केले.

ह.भ.प.चंद्रकांत महाराज वांजळे यांनी पुढे बोलताना साहेबराव बुट्टेपाटील यांच्या जीवन - कर्तृत्वाला उजाळा दिला. भारत हा देश तरुणांचा असून तो निर्व्यसनी व चारित्र्यसंपन्न असावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. बुद्धिनिष्ठा, नितीनिष्ठा, धैर्यनिष्ठा, देशनिष्ठा व मातृनिष्ठा हे जीवनाचे पंचामृत असून माणसाचा पिंड त्यावर पोसला जायला हवा, यासाठी साहेबराव बुट्टे पाटील यांच्या जीवन ग्रंथाची पाने वाचण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

या प्रसंगी सानिया पिंगळे, तेजेस्विनी गौड या विद्यार्थिनींनी मनोगते व्यक्त केली.

सूत्रसंचालन प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
कार्यक्रम व उत्सव समिती

HRM

स्व. साहेबांना अभिवादन करताना मान्यवर

ह.भ.प.चंद्रकांत महाराज वांजळे यांचे व्याख्यान श्रवण करताना विद्यार्थी

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष □ड. देवेंद्र बुट्टेपाटील साहेब रक्तदान करताना

पुढारी

‘साहेबराव बुट्टे पाटील यांनी ज्ञानाची शक्ती उभी केली’

राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा

माणसाचे समग्र जीवन उजळून टाकण्याचे सामर्थ्य शिक्षणात असल्याचे ओळखून माजी आमदार साहेबराव बुट्टे पाटील यांनी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने ज्ञानाची शक्ती उभी केल्याचे गौरवोद्गार ह.भ.प. चंद्रकांत महाराज वांजळे यांनी व्यक्त केले.

साहेबराव बुट्टे पाटील यांच्या २३ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के. आर. पाचारणे आदी उपस्थित होते.

ह.भ.प. चंद्रकांत महाराज वांजळे यांनी या वेळी साहेबराव बुट्टेपाटील यांच्या जीवनकर्तृत्वाला उजाळा दिला. भारत हा तरुणांचा देश असून, तो निर्व्यसनी व चारित्र्यसंपन्न असावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. बुद्धिनिष्ठा, नीतिनिष्ठा, धैर्यनिष्ठा, देशनिष्ठा व मातृनिष्ठा हे जीवनाचे पंचामृत असून, माणसाचा पिंड त्यावर पोसला जायला हवा, यासाठी साहेबराव बुट्टे पाटील यांच्या जीवनग्रंथाची पाने वाचण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

माजी आमदार स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात रक्तदान करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील.

या प्रसंगी सानिया पिंगळे, तेजस्विनी गौड या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. स्मृतिदिनानिमित्त क्रीडाज्योत, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, भीत्तिपत्रकाचे अनावरण, हस्ताक्षर स्पर्धा आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या वेळी एनसीसी कॅडेटनी मानवंदना दिली. राष्ट्रीय सेवायोजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ६० रक्तदात्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधीक्षक अरुण बर्डे, रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. श्रद्धा पतंगे, डॉ. अश्विनी सूर्यवंशी सहभागी झाले. सूत्रसंचालन प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केले.

My Gramin Edition
Jan 4, 2024 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

गुरुवार, ४ जानेवारी २०२४ राष्ट्रसंचार

साहेबराव बुट्टेपाटील यांनी ज्ञानाची शक्ती उभी केली : चंद्रकांत वांजळे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : माणसाचे समग्र जीवन उजळून टाकण्याचे सामर्थ्य शिक्षणात असल्याचे ओळखून माजी आमदार साहेबराव बुट्टेपाटील यांनी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने ज्ञानाची शक्ती उभी केल्याचे गौरवोद्गार हभप चंद्रकांत महाराज वांजळे यांनी व्यक्त केले. ते साहेबराव बुट्टेपाटील यांच्या २३ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते.

ह. भ. प. वांजळे यांनी पुढे बोलताना साहेबराव बुट्टेपाटील यांच्या जीवन - कर्तृत्वाला उजाळा दिला. भारत हा देश तरुणांचा असून तो निर्व्यसनी व चारित्र्यसंपन्न असावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. बुद्धिनिष्ठा, नितीनिष्ठा, धैर्यनिष्ठा, देशनिष्ठा व मातृनिष्ठा हे जीवनाचे पंचामृत असून माणसाचा पिंड त्यावर पोसला जायला हवा, यासाठी साहेबराव बुट्टे पाटील यांच्या जीवन ग्रंथाची पाने वाचण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

यावेळी सानिया पिंगळे, तेजेस्विनी गौड या विद्यार्थिनींनी मनोगते व्यक्त केली. स्मृतिदिनानिमित्त क्रीडाज्योत, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, भीत्तिपत्रकाचे अनावरण, हस्ताक्षर स्पर्धा आदि विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. एनसीसी कॅडेट्सनी मानवंदना दिली. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ६० रक्तदात्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधिक्षक अरुण बर्डे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. श्रद्धा पतंगे, डॉ. अश्विनी सूर्यवंशी सहभागी झाले.

अभिवादन ! राष्ट्रसंचार छायाचित्र सेवा

राजगुरूनगर : साहेबराव बुट्टेपाटील यांच्या २३ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात नागरिकांची उपस्थिती होती.

लोकमत

दै. लोकमत वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा!

स्व. साहेबरावजी बुट्टेपाटील

माजी आमदार, खेड तालुका
संस्थापक अध्यक्ष, खे.ता.शि.प्र. मंडळ

२३ व्या स्मृतिदिनानिमित्त

विनम्र अभिवादन

अभिवादन कार्यक्रम
३ जाने.२०२४ रोजी स.८ वा.
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय,
राजगुरुनगर येथे होईल.
व्याख्यान (स.८.३० वा.)
ह.भ.प.चंद्रकांत महाराज वांजळे
भव्य रक्तदान शिबीर (स.९ वा.)

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरु महाविद्यालय राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे.
साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे.
शिंगेश्वर विद्यालय कुडे बु||., ता.खेड, जि.पुणे.

मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, मानद सचिव, सर्व संचालक, सभासद,
शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी.

Hello Pune Gramin
Page No. 5 Jan 01, 2024
Powered by: erelego.com